75 (8) 2020-21

Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

## August-2020









Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

Executive Editor:
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

Scanned with OKEN Scanner

(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308


# B.Aadhar


## Peer-Reviewed Indexed


## Multidisciplinary International Research Journal

**August -2020**

**ISSUE NO-CCXLII (242)**





**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
**Dr.Dinesh W.Nichit**
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor :**
**Dr.Sanjay J. Kothari**
Head,Deptt.of Economics,
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe ArtsComm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

## The Journal is indexed in:

**Scientific Journal Impact Factor (SJIF)**

**Cosmos Impact Factor (CIF)**

**International Impact Factor Services (IIFS)**

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| 20 | भारतीय शेती उत्पादकता कमी असण्याची कारणे, परिणाम व उपाय **डॉ.दिलीप पांडुरंग महाजन** | 87 |
| 21 | डॉ. बाबासाहब अम्बेडकर के राजनीतिक विचार प्रा. डॉ. यशवंत मेश्राम | 96 |
| 22 | राष्ट्रसंत तुकडोजी आणि जपानमधील विश्वधर्म परिषद कु. माधुरी दौलतराव शेळके | 100 |
| 23 | जगतीकीकरणाचा कृषी क्षेत्रावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे प्रा.डॉ. बाळकृष्ण पुं. अढाऊ | 103 |
| 24 | दलित-आंबेडकरी कवयित्रींच्या काव्यातील 'आंबेडकरी दर्शन' प्रा. डॉ. अजय चिकाटे | 107 |
| 25 | समाजसुधारणेचे महामेरू राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रा.डॉ. वामन खोब्रागडे | 115 |
| 26 | कोरोना संचारबंदी कालखंडात महिलांवर होणारा कौटुंबिक हिंसाचार आणि शासनाची भूमिका — एक अभ्यास डॉ. सुर्यकांत जाऊळकर | 119 |
| 27 | परविन सुल्ताना- स्वरधुंदी व सुरेलता **डॉ. सरिता इंगळे (बोदिले)** | 123 |
| 28 | समाज प्रबोधनाच्या प्रक्रियेमध्ये मार्क्सवादी कवींचे योगदान प्रा.डॉ.अरविंद युगंधर | 132 |
| 29 | किरण नगरकर यांची कादंबरी प्रतिस्पर्धी (ककल्ड) : एक चिंतन डॉ. राजेंद्र गोविंदराव नाईकवाडे | 142 |
| 30 | पाली साहित्यात प्रतिबिंबित बुध्दकालीन चेतिय (चैत्य) डॉ. मनोहर तुळशीराम कुंभारे | 145 |
| 31 | संत तुकारामांची कविता प्रा.डॉ.विलास खुणे | 150 |
| 32 | अंतर्मनाचा सच्चा सूर — कदाचित अजूनही डॉ.मीता दिनकरराव कांबळे | 155 |
| 33 | Perspectives on role of the library in the emerging wisdom society Dr. Damodhar Z. Raut | 160 |
| 34 | The Contribution of Local Level Banks in the Post Independence Urbanisation of Nashik City: A Historical study **Milind R. Thorat** | 166 |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 242 (CCXLII)
ISSN : 2278-9308
August,2020

# भारतीय शेती उत्पादकता कमी असण्याची कारणे, परिणाम व उपाय

प्रा.डॉ.दिलीप पांडुरंग महाजन
(अर्थशास्त्र विभाग प्रमुख)
एस.पी.एम. तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय, चिखली जि.बुलडाणा ४४३२०१

**सार :-**

भारतीय शेतीची उत्पादकता कमी असण्याची कारणे, परिणाम व उपाय यांचा थोडक्यात परामर्श घेण्याचा प्रस्तुत शोध निबंधात प्रयत्न निबंध लेखकाने केला आहे.

**प्रस्तावना :-**

भारत शेती प्रधान देश असुन देशातील जवळपास ५२ % टक्के कार्यकारी लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. मात्र एकुण अंतर्गत उत्पादन (GDP) मध्ये शेतीचा हिस्सा २००९-१० मध्ये केवळ १४.६ % होता. देशातील ४८ % कार्यकारी लोकसंख्या जी गैरकृषी व्यवसाय कार्यरत आहे त्यांचे एकुण अंतर्गत उत्पादनातील (GDP) योगदान ८३% आहे. गैरकृषी क्षेत्रात प्रती श्रमीक उत्पादनाच्या तुलनेत शेतीत प्रती श्रमीक उत्पादनाचे प्रमाण जवळपास अर्ध्यापेक्षाही हमी आहे. यामुळे शेती उत्पादनात भारताची उत्पादकता कमी आढळून येते. शेती हा भारतीय अर्थव्यस्थेचा कणा असुन खेड्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. ही शेती मान्सुनचा जुगार आहे. त्यामुळे तिची उत्पादकता इतर देशांच्या तुलनेत फारच कमी आहे.

पीक उत्पादन आंतरराष्ट्रीय तुलना (२००२) (दरहेक्टरी उत्पादन कि.ग्रॅ.) मध्ये

| गहू | तांदूळ | ऊस | भूईमुग | मका |
|---|---|---|---|---|
| इंग्लंड - ८०८३ | इजिप्त - ९१३५ | इजिप्त - ११९८९३ | अमेरिका - ३३९३ | इटली - ८९४२ |
| फ्रान्स - ७४४९ | अमेरिका - ७३७२ | कोलंबीया - ९४७९८ | चिन - ३१४३ | फ्रान्स - ८५९३ |
| भारत - २७७० | भारत - २९६४ | भारत - ६८०४९ | भारत - ७९४ | भारत ‍= १८०६ |

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये :-**

१) शेतीची उत्पादकता कमी होण्याची कारणांचा अभ्यास करणे.
२) शेतीची उत्पादकता वाढविण्याच्या उपायांचा अभ्यास करणे.
३) शेतीची उत्पादकता कमी होण्याच्या परिणामांचा अभ्यास करणे.

**गृहीतके :-**

अतिरिक्त लोकसंख्येचा वाढत्या दबावामुळे व नैसर्गिक परिस्थितीमुळे GDP तील पीक शेतीचा हिस्सा कमी होवुन समस्या निर्माण होत आहेत.

**संशोधन पध्दती :-**

सदर संशोधन लेख अभ्यास पूर्णपणे दुय्यम सामुग्रीवर आधारीत असून त्यासाठी अर्थशास्त्राची विविध पुस्तके, ग्रंथ, वर्तमानपत्रे, साप्ताहिके, विविध अहवाल, मासिके, वार्षिकांक इ. संदर्भ म्हणून वापरण्यात आलेले आहे. कृषी क्षेत्राच्या संबंधाची माहिती विविध मासिके व वर्तमान पत्रातून घेतलेली आहे.

**भारतीय शेतीचे महत्त्व :-**

भारत हा शेती प्रधान देश असुन आजही भारतातील जवळपास निम्म्यापेक्षा जास्त लोकसंख्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या शेतीवर अवलंबून आहे. गेल्या काही दशकात भारतीय लक्षणीय प्रगती झाल्याचे दिसते. भारतीय शेतीतून अन्नधान्य पिके, व कृषी उद्योगांना आवश्यक असणारा कच्चा माल पुरेशा प्रमाणात उपलब्ध होण्यास या प्रगतीने हातभार लावला.



Scanned with OKEN Scanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675, Issue NO, 242 (CCXLII)
ISSN : 2278-9308
August,2020

८७-८८ -

**अन्नधान्याचे एकुण उत्पादन :-** ५०८ लक्षटन

५०-५१ -

९४-९५ -

१३९४ लक्षटन ८२० लक्षटन

६०-६१ -

९६-९७ -

१८५१ लक्षटन १०९४ लक्षटन

७०-७१ -

९८-९९ -

१९९३ लक्षटन १२९६ लक्षटन

८०-८१ -

२००० लक्षटन

भारतात दमाणसी शेतीचे प्रमाण ०.१९ आहे. भारताची दर हेक्टरी उत्पादकता (१९९४) मध्ये (१०० किलोग्रॅममध्ये) उत्पादकता

गहू - २४.२
तांदूळ - २८.२
कापूस - ३
भुईमुग - १० एवढी होती.

भारतीय सरासरी शेतीचा आकार २.६३ हेक्टर असुन सध्या डाळी उत्पादनात भारत जगातील प्रथम क्रमांकाचा देश असुन, तांदुळ व गहू उत्पादनात भारताचा २ रा क्रमांक लागतो. साखर उत्पादनातही भारताचा २ रा क्रमांक असून १२ व्या पंचवार्षिक योजनेनुसार पुढील वर्षात ४ % कृषी विकासाचे उद्दिष्ट समोर ठेवले आहे. देशाच्या प्रगतीतील शेती क्षेत्राचे महत्व ओळखून स्थूल देशांतर्गत उत्पादनातील (GDP) असणारा कृषीचा वाटा सातत्याने कमी/घटत पुढील तक्त्यात दर्शविला आहे.

**भारतीय शेतीचा GDP मधील हिस्सा -**

| वर्ष | शेतीचा हिस्सा | वर्ष | शेतीचा हिस्सा |
|---|---|---|---|
| १९५०-५१ | ५६.५ | २००७-०८ | १८.५१ |
| १९७०-७१ | ४५.९ | २००८-०९ | १६.४ |
| १९९०-९१ | ३४.०० | २००९-१० | १५.७ |
| २०००-०१ | २४.७ | २०१०-११ | १४.२ |
| २००६-०७ | १९.५५ | २०११-१२ | १३.९ |

संदर्भ :- CSO and Ecpnomic survey २००९-१०, २०१२

भारतीय अर्थव्यवस्थेत २०१३ च्या आकडेवारी वरुन जवळपास ६० % पेक्षा अधिक लोकप्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या उदर्रानर्वाहासाठी शेतीवर अवलंबून असून स्थुल देशांतर्गत उत्पादनाच्या (GDP) १३.९ % इतका हिस्सा शेती क्षेत्राचा असल्याचे दिसते. २००६-०७ च्या आर्थिक वर्षातील आकडेवारीनुसार स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या (GDP) १८ % हिस्सा शेती क्षेत्राचा होता. भारताच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या जवळपास ४३ % हिस्सा शेती क्षेत्राने व्यापलेला आहे.

 ISSN : 2278-9308
August,2020

**शेतीची उत्पादकता कमी होण्याची कारणे -**

**१) वाढती लोकसंख्या :-**

| वर्ष | भारतातील अन्नधान्य उत्पादन | लोकसंख्या |
|---|---|---|
| १९४९-५० | ५१ दशलक्ष टन | ४० कोटी |
| १९७०-७१ | ११० दशलक्ष टन | ७० कोटी |
| १९८५-८६ | १४५ दशलक्ष टन | १०० कोटी |
| २०१०-२०११ | २४० दशलक्ष टन | १२१ कोटी |

(संदर्भ - सकाळ ॲग्रोवन बुधवार दि.११ ऑगस्ट २०११)

वर्ष १९०१ मध्ये शेतीवर १६३ दशलक्ष लोक अवलंबून होतो. २०१५ मध्ये हे प्रमाण ६५५ दशलक्ष पेक्षा जास्त लोक शेतीवर अवलंबून आहेत. वाढत्या लोकसंख्येला उद्योग व इतर क्षेत्रात सामावुन घेण्यात अपयश आल्याने शेतीतील गर्दी वाढली व शेत जमीनीवर वाढत्या अतिरिक्त लोकसंख्येचा ताण निर्माण झाला. शेती क्षेत्रात प्रच्छन्न, अर्ध, हंगामी बेकारी वाढली. यामुळे सुधारणांकडे दुर्लक्ष होऊन उत्पादकता घटली.

**२) वाढती बेरोजगारी -**

| कृषी व संलग्न क्षेत्र | १९५०-५१ | २०१३-१४ |
|---|---|---|
| रोजगार निर्मितीतील वाटा | ७५.९% | ४८.९% |
| भांडवल निर्मितीतील वाटा | १७.७% | ७.७% |
| निर्यातीतील वाटा | २४% | १४.२% |

**३) कृषि पिक उत्पादन (१९५०-५१ ते २०१३-१४)**

हरीत क्रांतीत कापसाची उत्पादकता अडीच कोटीने तर ऊसाची दुपटीने वाढली. गव्हाच्या उत्पादनात चौपट वाढ झाली. तांदुळाच्या उत्पादनात तिपटीने वाढ झाली. अन्नधान्य उत्पादनात दरहेक्टरी १७१ % वाढ झाली.

| गट | १९५०-५१ | १९६४-६५ | २०१३-१४ |
|---|---|---|---|
| अन्नधान्य दशलक्ष टन | ५१ दशलक्ष टन | ८९ दशलक्ष टन | २६४.७७ |
| तेलबीया टन | ५ दशलक्ष टन | ९ दशलक्ष टन | ३२.८८ दशलक्ष |
| ऊस दशलक्ष टन | ५७ दशलक्ष टन | १२२ दशलक्ष टन | ३५०.०२ |
| कापुस (१७० कि.ग्रॅ/मिलीयन टन) टन | ३ दशलक्ष टन | ६ दशलक्ष टन | ३६.५९ दशलक्ष |
| ज्युट (१८० कि.ग्रॅ. मिलीयन टन) टन | ३ दशलक्ष टन | ४ दशलक्ष टन | ११.५८ दशलक्ष |

**नगदी पिकांचे वाढते प्राबल्य -**

| कृषी उत्पादन | १९५०-५१ | २०१३-१४ |
|---|---|---|
| तांदुळ | २१ दशलक्ष टन | १०६.५ दशलक्ष टन |
| गहू | ६ दशलक्ष टन | ९६ दशलक्ष टन |
| इतर | २४ दशलक्ष टन | ६२.३ दशलक्ष टन |
| भारत (एकुण उत्पादन) | ५१ दशलक्ष टन | २६४.७७ दशलक्ष टन |



Scanned with OKEN Scanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 242 (CCXLII) | ISSN : 2278-9308 August,2020

डाळींचे उत्पादनात वाढ होत आहे.

२०१४-१५ मध्ये १७१.५ लाखटन, २०१५-१६ मध्ये १७०.६ लाखटन, २०१६-१७ मध्ये २०० लाखटन (अंदाजे)

**४) शेतकऱ्यांची निरक्षरता -**

२०११ च्या जन गणनेनुसार अद्यापही २६ % पेक्षा जास्त निरक्षरतेचे प्रमाण ग्रामीण भागात आहे. त्यामुळे अंधश्रध्दा, परंपरा, पुराणमतवादाचा पगडा आहे. दैवावर विश्वास आहे. त्यामुळे प्रागतीक विचाराबाबत निरुत्साही असतात. रासायनिक खते, सुधारीत बियाणे, आधुनिक अवजारे, नविन यंत्रे, उत्पादनाच्या नव्या पध्दतीचा स्विकार प्रवृत्ती कमी असल्याने उत्पादन कमी राहाते.

**५) सिंचन सुविधांचा अभाव -**

भारताच्या विभाजनापूर्वी १९ % जमिन सिंचनाखाली होती आजही हे प्रमाण ३६ % भूमीवर सिंचन होते.

| सिंचन स्त्रोत (२०११-१२) | प्रमाण |
|---|---|
| कालवे | २६.३% |
| तलाव | ३.५% |
| विहीरी | १८.५% |
| कूपनलिका | ४५% |
| इतर | ६.६% |

सध्या भारतात १४०.८ मिलीयन हे इतके निव्वळ लागवड क्षेत्र (Net sown Area) उपलब्ध आहे. त्यामुळे अपेक्षीत सिंचन क्षमता (Ultimate Irrigation Potential) १४०.८ मिलीयन हे होते. साध्य सिंचन क्षमता (potential created) १०३ मिलीयन हेक्टर आहे. उरलेली ३७.८ मिलीयन हेक्टर जमीन ओलीताखाली येणे बाकी आहे. निव्वळ सिंचित क्षेत्र (Net Irrigated Area) १९५०-५१ मध्ये २३ मिलीयन हे, होते. २०११-१२ मध्ये प्रत्यक्षात फक्त ६५.५ मिलीयन हे. पर्यंत पाणी पोहोचले आहे. ढोबळ सिंचित क्षेत्र (Gross Irrigated Area) २०११-१२ मध्ये ९१.५ मिलीयन हेक्टर होते.

**६) खतांचा वापर कमी :- खतांचा वापर (लाख टनात)**

| वर्ष | खतांचा वापर | उत्पादन | आयात |
|---|---|---|---|
| १९५०-५१ | ०.६६ | ०.३९ | ०.५२ |
| १९९१-९२ | १२७.३ | ११८.६ | २७.६ |
| २०११-१२ | २७७.४ | १६३.६१ | १३० |
| २०१३-१४ | २३९.६ | १६०.९ | ६७.३१ |

खताचा वापर २०१३-१४ मध्ये २३९.६ लाख टनांवर गेले.

**७) खते सबसिडी -**

२००८-०९ मध्ये ७६६०३ को. होती. मात्र अलीकडे त्यात कपात केली. सुन खते सबसिडी खतांसाठी दिलेल्या सबसिडीत वाढ करुन ती २००८-०९ मध्ये ७६६०३ को. होती. मात्र अलीकडे त्यात कपात केली असुन २०१३-१४ मध्ये ६७,९७१ को.रु. होती. तर २०१४-१५ मध्ये अंदाजे ७२,९७० को.रु. ची अपेक्षीत तरतुद होती ती कमी आहे.

**८) उच्चतम उत्पादनाचे वाण कार्यक्रम (High yielding varictis program)**

दर हेक्टरी उत्पादन क्विंटल -

| पिक | १९५०-५१ | १९६४-६५ | २०१२-१३ |
|---|---|---|---|
| तांदुळ | ७.१ क्वींटल | १०.८ क्वींटल | २२.८ क्वींटल |
| गहू | ६.६ क्वींटल | ९.१ क्वींटल | ३०.१ क्वींटल |
| इतर | २.१ क्वींटल | २.६ क्वींटल | ५.८ क्वींटल |
| एकूण | ५.५ क्वींटल | ७.६ क्वींटल | १९.७ क्वींटल |

१) किमान आधारभूत किंमती (रु. प्रति क्विंटल)

| अ.क्र. | खरीप पिके | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | भात | १४०० | १४५० | १७५० | १७५० | १७५० |
| २) | ज्वारी | १५५० | १५९० | १७०० | २४३० | २४३० |
| ३) | बाजारी | १२५० | १२७५ | १४१० | १९५० | १९५० |
| ४) | मका | १३१० | १३२५ | १४२५ | १७०० | १७६० |
| ५) | नाचणी | १५५० | १६५० | | | |
| ६) | तुर | ४३५० | ४०५० | ५४५० | ५६७५ | ५६७५ |
| ७) | मुग | ४६०० | ५२२५ | ५५७५ | ६९७५ | ६९७५ |
| ८) | उडीद | ४३५० | ४६२५ | ५४०० | ५६०० | ५६०० |
| ९) | भुईमुग | ४००० | ४०३० | ४८९० | ४८९० | ४८९० |
| १०) | सोयाबीन | २५६० | २६०० | ३३९९ | ३४५० | ३७१० |
| ११) | सुर्यफुल | ३७५० | ३८०० | ४१०० | ५३८८ | ५३८८ |
| १२) | तिळ | ४६०० | ४७०० | | | |
| १३) | कारळा | ४६०० | ४७०० | | | |
| १४) | कापूस | ४०५० | ४१०० | ५४५० | ५४५० | ५५५० |

रब्बी पिके -

| अ.क्र. | रब्बी पिके | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | गहू | १४५० | १५२५ | १७३५+बोनस | १८४० | १८४० |
| २) | ज्वारी | ११५० | १२२५ | १७०० | २४३० | २४३० |
| ३) | हरभरा | ३१७५ | ३४३५ | ४४०० | ४६२० | ४६२० |
| ४) | मसुर | ३०७५ | ३३२५ | ४२५० | | |
| ५) | मोहरी | ३१०० | ३३५० | ४००० | | |
| ६) | करडई | ३०५० | | ४००० | ४१०० | |
| ७) | राई | ३०२० | | ४००० | ४०००+बोनस | |

इतर पिके -

| अ.क्र. | रब्बी पिके | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नारळ | ५५०० | | | | |
| २ | ज्युट | २४०० | | | | |
| ३ | ऊस | २२२० | २५५० | २५५० | २५५० | |

किमान आधारभुत किंमतीत अत्यंत कमी प्रमाणात १५ ते २७५ रु. पर्यंतच प्रती क्वींटल वाढ देण्यात आली जी आमच्या महागाई दराच्या अत्यंत कमी आहे. शेतमालाला रास्तभाव देण्यात आलेला नाही.

डाळीचे उत्पादनात वाढ होत आहे.

२०१४-१५ मध्ये १७१.५ लाखटन

२०१५-१६ मध्ये १७०.६ लाखटन

२०१६-१७ मध्ये २०० लाखटन (अंदाजे)



Scanned with OKEN Scanner

ISSN : 2278-9308
August,2020

**१०) कृषिवित्त -**

भारतीय शेतकऱ्यांजवळ भांडवलाचा अभाव आहे. तो गरीब असून सतत कर्जबाजारी आहे.

(१९९१ मध्ये)

| | | | |
|---|---|---|---|
| सावकार | १७.६% | सरकार | ६.१% |
| व्यापारी | २.५% | सहकारी समित्या | २७.६% |
| नातेवाईक व मित्र | ५.५% | व्यापारी अधिकोष | ३३.७% |
| जमिनदार | ४.३% | इतर | २.७% |
| एकुण कर्ज पुरवठा | २९.९% | एकुण कर्ज पुरवठा | ७०.१% |

**११) कृषीविमा :-**

शेतीला पुरेसा कर्ज पुरवठा होण्यासाठी व कर्जपुरवठा त्यातील धोका कमी करण्याकरीता कृषी क्षेत्रासाठी स्वतंत्र भारतीय कृषी विमा महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. कृषी विम्याचा शेतकऱ्यांना आजही फायदा होत नाही.

**१२) सदोष कृषी विपणन :-**

गोदामांच्या व्यवस्था अत्यंत कमी असुन वाहतुकीच्या सोई अपूऱ्या आहेत. नियंत्रीत बाजारपेठांचा अभाव आहे. कित्येक ठिकाणी प्रमाणित वजनमापे नसतात. शेतकऱ्यांची कमी भावाने मध्यम वर्ग वसवणुक करतो. शेतमाल विणन व्यवस्था सदोष आहे. शेतकऱ्यांना अडते, दलाल, मध्यस्थ, लुबाडतात, दोषपुर्ण विक्रीत शेतकऱ्यांचे नुकसान होते. शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादनाला योग्य किंमत मिळत नाही. शेतमाल साठविण्यासाठी गोदामांच्या पुरेशा सोई नाहीत. स्वस्त कार्यक्षम वाहतुक व्यवस्था नसल्याने अशा किंमतीला शेतमालाची विक्री करावी लागते. प्रमाणित वजनमापांचा बऱ्याच ठिकाणी वापर होत नाही.

**१३) कृषी संशोधन कमी :-**

भारतात कृषी संशोधनावर स्थूल घरगुती उत्पादनापैकी केवळ ०.३% खर्च केला जात आहे. हरित क्रांतीने तांदळाच्या उत्पादनात दुपटीने वाढ होवुन गव्हाच्या उत्पादनात २२४% वाढ झाली व डाळीचे उत्पादन घटले.

**१४) कृषी क्षेत्रात घट**

कृषी क्षेत्रात घसरण गेल्या ५ वर्षातील कृषी व संलग्न क्षेत्रातील वृध्दीदरात घट पहायला मिळत आहे.

| | |
|---|---|
| २०१३-१४ | १२.३% |
| २०१४-१५ | (-) ०.७% |
| २०१५-१६ | (-) ३.२% |
| २०१६-१७ | २२.५% |
| २०१७-१८ | (-) ८.३% |

**१५) शेतीचे लहान आकारमान :- २०११-१२ (Provisional) -**

NSS नुसार १९६२ पर्यंत ५२% भूखंड हे २ हेक्टर पेक्षा कमी आकाराचे होते. ८६ मध्ये ७६.४ भूखंडाचा आकार २ हेक्टर पेक्षा कमी होता.

| गट | जमीन | एकूण कुटुंबे | धारणक्षेत्र | प्रति कुटुंब धारण क्षेत्र (हे.) |
|---|---|---|---|---|
| सिमांत | १ हे. पेक्षा कमी | ६७% | २२.५% | ०.३९ |
| लघू | १ ते २ हे. | १७.९% | २२.१% | १.४२ |
| अर्धमध्यम | २ ते ४ हे. | १०.१% | २३.६% | २.७१ |
| मध्यम | ४ ते १० हे. | ४.२% | २१.२% | ५.७६ |
| मोठे | १० हे. पेक्षा जास्त | ०.७% | १०.६% | १७.६८ |
| एकुण | | १००% | १००% | १.१५ |

१९०१ मध्ये लागवडी खालील जमीन दरडोई ०.४३ हेक्टर होती ती १९९८ मध्ये ०.२० हेक्टर होती.

देशाच्या एकुण उत्पादनात शेती उत्पादनाचा वाटा ५५% वरुन १९९८ पर्यंत २५.७% पर्यंत खाली येवुन २०११-१२ मध्ये हा वाटा १३.९% एवढा होता. शेतीचे तुकडी करण व विभाजन वाढती लोकसंख्या, मुलामुलींची लग्ने व शिक्षण इ. कारणांमुळे होवुन धारण क्षेत्राचे सरासरी आकारमान २ हेक्टर पेक्षाही कमी होवुन २००१ मध्ये दरडोई लागवडी खालील क्षेत्र ०.२० हे. इतके कमी झाले. त्यामुळे आधुनिक पध्दतीने शेती कसतायेत नाही. पाणी पुरवठ्याच्या कायम सोई करता येत नाहीत. शेतकऱ्यामध्ये भांडणे, तंटे, वाद कोर्टकचेऱ्यामुळे खर्च वाढून शेतीचे आकारमान कमी झाले.

**१६) अधिक शेती मान्सुनवर अवलंबून -**

भारतात मान्सुनचे आगमन वेळेवर व योग्य प्रमाणात झाल्यास कृषी उत्पादनात वाढ होते. अन्यथा अतिवृष्टी, दुष्काळामुळे उत्पादनात घट होते. भारतीय शेती ही मुख्यत्वे मान्सुनवर अवलंबून असून १९९१ पर्यंतही हे प्रमाणे. ६७% एवढे होते.

**१७) उत्पादन PMI -**

निक्केई भारत उत्पादन खरेदी निर्देशांक (PMI) मार्च २०१६ मध्ये ५२.४ होता, तर एप्रीलमध्ये ५०.५ वर आला आहे तर जुन २०१६ महिन्यात ५१.७ वर आहे. तसेच २०१५-१६ च्या हंगामात साखर उत्पादनातही ११% ची घट झाली आहे. साखर उत्पादनात १० लाख टनापर्यंत घट आहे.

**१८) शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा -**

शेतकरी आर्थिकदृष्ट्या गरीब असल्याने शेतात गुंतवणूकसाठी ९०% शेतकऱ्यांना गोरवाळा समितीच्या मते सावकाराकडुन कर्जे काढावी लागतात. सावकार अवाजवी व्याज आकारतो, फसवणुक करतो. संस्थात्मक स्त्रोतांव्दारे होणारा कर्ज पूरवठा कमी आहे. अर्ज करणे तारणदेणे, कागदपत्रांची पुर्तता इ. निरक्षर शेतकऱ्यांच्या दृष्टीने डोकेदुखी ठरत असल्याने शेतकरी कर्ज सुविधेपासुन वंचित राहतात. त्यामुळे भांडवला अभावी उत्पादन कमी होते.

गरीब शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी, बचत कमी, उचल संचय कमी यामुळे दारिद्र्याचे प्रमाणे अधिक पुरेशी वागणूक शेतात करु शकत नाही. त्यामुळे बी-बीयाणे, रासायनिक खते, यंत्रे, ट्रॅक्टर आवश्यक अवजारे, शेतमालाची साठवण इ. पुरेशी गुंतवणूक करु शकत नाही. त्या दारिद्र्यामुळेच शेतीची उत्पादकता कमी राहते.

**१९) निरुत्साही ग्रामीण वातावरण -**

भारतीय शेतकरी गरीब, निरक्षर, दैववादी, अज्ञानी, अंधश्रध्दाळू, परंपरावादी, जातीव्यवस्थेचा पगडा असलेला आहे. एकत्र कुटूंब पध्दतीमुळे कुटूंबातील सदस्यांमध्ये जबाबदारीची जाणीव नसते. ग्रामीण राजकारणामुळे सामाजिक वातावरण प्रदूषीत बनते. राजकारणाने समाजात दुफळी निर्माण होते.

**२०) व्यावसायिक दृष्टिकोनाचा अभाव -**

शेती उदरनिर्वाहाचे साधन मानले गेल्याने शेतीतही नफा होऊ शकतो याची जाणीव शेतकऱ्यांत त्याच्यात नाही.

**२१) नैसर्गिक घटक -**

भारतीय शेती लहरी निसर्गावर अवलंबून आहे. धो-धो पाऊस कमी पाऊस दुष्काळ, चक्रीवादळे थंडी, टोळधाड, सुनामी इ.मुळे शेतीचे नुकसान होते. हवामानात अचानक बदल झाल्याने पिकांवर वाईट परिणाम होऊन पिकांवर रोग पडतात व कृषी उत्पादनात घट होते.

**२२) जमिनीची धुप -**

ऊन, वारा, पाऊस इ.मुळे जमिनीची मोठ्या प्रमाणात धूप होऊन जमिनीवरचा मातीचा थर वाहून जातो. जमिनीच्या कसाचा थर कमी झाल्याने उत्पादन क्षमता घटते. जमिनीची झीज होते ती निरुपयोगी बनते.

**२३) मातीदोष -**

भारतीय शेतीतील मातीत नायट्रोजनची कमी तसेच पाणी भरणे, भुमी करणे इ. दोष आढळतात.त्यामुळे कृषी उत्पादन कमी आहे.

पिकांच्या सुरक्षेचा अभाव - भारतात किटक, किडे, मकोडे पिकरोग यामुळे एकूण खाद्यांनाच्या १६% यामुळे अन्नधान्यपिक नष्ट होते.



Scanned with OKEN Scanner

**२४) योग्य बियाण्यांचा अभाव -**

भारतीय शेतकरी योग्य बी-बीयाणे उपयोग करत नाही. तो उत्पादीत उत्पादनांचाच अधिकांश बीयाणे म्हणून वापर करतो त्यामुळे ती अधिकारी चांगली बियाणे नसतात.

**२५) योग्य रासायनिक खतांचा अभाव -**

भारतात रासायनिक खतांचा वापर प्रती हेक्टर मध्ये १२८.६ किलोग्रॅम एवढा कमी आहे. जो इतर देशात बराच जास्त आहे. उदा.जपान ३६५ कि.ग्रॅ. संयुक्त अरब गणराज्य ४०० कि.ग्रॅ. बेल्जीयम २७६ कि.ग्रॅ. खताचा वापर करतात.

**परिणाम -**

१) कृषीप्रधान असलेल्या भारतात दररोज २०,००० शेतकरी शेतीकडे पाठ फिरवित असल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. हे चक्र असेच चालु राहिल्यास खाद्यान्नासाठी भारत तरसेल व भिषण खाद्यान्न संकट निर्माण होईल. २०११ च्या जनगणनेनुसार शेतीशी जुळलेल्या लोकांची संख्या ११ कोटी ८० लाख एवढी होती ती आत त्यापेक्षा कमी झाली आहे.

२) २५% किटकनाशके नकली असल्याने खाद्यान्न उत्पादनात १० लाख ६० हजार टन घट झाली आहे. अन्नधान्याचे उत्पादन घटून नगदी पिकांचे उत्पादन दिवसेंदिवस वाढ होत आहे असेच चालू राहिल्यास अन्नधान्य सुरक्षे बाबत मोठा प्रश्न निर्माण होईल.

३) कृषी उत्पादनात नैसर्गिक पर्यावरणातील बदलांमुळे उत्पादनावर घट होत आहे.

४) साक्षरतेचा दर कमी आहे.

५) सिंचनात एवढ्या वर्षात अत्यंत कमी वाढ झाली.

६) खतांच्या वापरामुळे व सिंचनामुळे जमिनीचा कस नष्ट होवुन दिवसेंदिवस उत्पादकता कमी होत आहे.

७) अयोग्य बि बीयाणांमुळे उत्पादनात घट होत आहे.

८) शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या आजतागायत २ लाख १० हजार च्या वर झालेल्या आहेत.

९) बेरोजगारी वाढली.

१०) कमी आधारभूत किंमतीमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या कमी उत्पादनामुळे वाढत आहेत.

११) बँका सहज वित्त पुरवठा शेतकऱ्यांना करीत नाहीत. त्यामुळे सावकाराकडून जास्त व्याजदराने कर्ज घ्यावे लागते परिणामी कर्ज फेड होऊ न शकल्याने शेतकऱ्यांवर आत्महत्त्येची वेळ येते.

**उत्पादन वाढीचे उपाय -**

१) राष्ट्रीय बी बीयाणे महामंडळ स्थापना करुन दर्जेदार बीयाणे वापरावीत.

२) रासायनिक खत कारखान्याची स्थापना करुन जास्त रासायनिक खते वापरावीत.

३) सिंचन सुविधांचा विस्तार वाढवावा. ठिबक सिंचन प्रणालीवर भर द्यावा.

४) पिकांचा रोगांपासुन बचाव - पिक संरक्षण करावे.

५) चक बंदी करणे.

६) कृषी लागत व मुल्य आयोगाची स्थापना करुन कृषी उत्पादनाला योग्य किंमती (हमीभाव) द्यावेत.

७) प्रशिक्षण व जमीन सुधारणा कार्यक्रम राबवावा. कृषीमालाची श्रेणी व प्रत नियंत्रण योग्य पध्दतीने करुन प्रमाणीत वजन मापांचा कायदा कडक करावा.

८) ग्रामीण भागात बँकींग सुविधांचा विस्तार करुन सुलभ भांडवल पुरवठा वाढवावा.

९) सहकारी शेतीत वाढ करणे.

१०) नियमीत नियंत्रीत बाजारांची स्थापना करुन निर्दोष विक्री व्यवस्था लागू करावी.

११) कृषीचा आकार वाढविण्यासाठी (लहान न होण्यासाठी) उपाय करणे.

१२) राष्ट्रीय कृषी पिक विमा योजना (कमी दरात) सर्वांना लागू करणे.

१३) कृषी संशोधन व विकासावर भर द्यावा. (कृषी विद्यापीठात वाढ करणे) प्रोत्साहन द्यावे.

१४) शेत जमीनीची धुप रोखण्यासाठी मृदसंधारणाचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर राबवावा. आधुनिक उत्पादनतंत्राचा वापर वाढवावा. शेतीवरील कर कमी करणे. शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनात व्यापारी दृष्टी वाढवावी. विस्तार सेवात वाढ करुन जिल्हा पातळीवर आत्मा योजना सुरु (Agricultural Technology Manegment Agency) करावी. लोकसंख्या नियंत्रणाचे महत्व लोकांना समजावून सांगावे.

**शिफारशी/सुचना -**

भारतातील लोकसंख्या नियंत्रणासाठी उपाय योजना आखून संपूर्ण साक्षरतेसाठी सरकारने कडक कायदे करावेत. सर्व विकासाठी पिकविमा आवश्यक करुन त्याचा हप्ता कमी करावा. त्यासाठी अनुदानाची तरतुद करावी, नद्याजोड प्रकल्पावर शासनाने जाणीवपूर्वक लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. किमान आधारभूत किमतीच्या दरात महागाई दरानुसार वाढ करावी जेणे करुन शेतकऱ्यांच्या हातात काही पडून त्याला आत्महत्त्या करावयाची वेळ येणार नाही. कृषीमाल स्वतःशासनाने खरेदी करावा व नंतर व्यापाऱ्यांना विकावा म्हणजे शेतकऱ्यांची फसवणूक टाळता येईल. कृषी संशोधना वरील खर्चाचे प्रमाण वाढवून संशोधनावर भर द्यावा.

**निष्कर्ष :-**

गेल्या काही वर्षापासून भारतात नापीकी दुष्काळ, कर्जबाजारीपणा यामुळे भारतीय शेतकरी आत्महत्त्या करतांना दिसत आहे. हा शेतकरी देशाचा कणा आहे. हा कणाच कर्जबाजारी पणा व नापिकीने मोडून पडत आहे. शेती विकासासाठी दुरगामी व परिणामकारक उपाय योजना शेतीत कराव्या लागतील त्यासाठी उत्पादन खर्चावर आधारीत भाव द्यावा लागेल.

सिंचनासाठी पाणी, वीज, वेळेवर कर्ज पुरवठा द्यावा लागेल. त्याबाबत उपाय योजनांवर भर द्यावा लागेल. शेतकरी उभा राहील्यास तो अन्नधान्य पिकविल व मिळालेल्या पैशावर शेतीत नवनवीन तंत्रज्ञान वापरुन भारत खऱ्या अर्थाने जगात सर्वाधिक धान्य निर्यात करणारा देश निर्माण होऊ शकेल.

**संदर्भ सुची -**

१) दत्त एवं सुंदरम - भारतीय अर्थव्यवस्था-दत्त/महाजन - एस चँद एँड कं.-प्रा.लि.नई दिल्ली
२) भारतीय अर्थव्यवस्था - प्रतियोगिता दर्पण (सामान्य अध्ययन) उपकार प्रकाशन, आग्रा
३) भारतीय अर्थव्यवस्था - भोसले/काटे, फडके प्रकाशन - कोल्हापूर
४) सामान्य अध्ययन - भारतीय अर्थव्यवस्था - प्रतियोगिता साहित्य सिरिज, साहित्य भवन प्रकाशन, आग्रा
५) भारतीय अर्थव्यवस्था, विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र, डॉ.जी.एन.झामरे, पिंपळापूरे प्रकाशन नागपूर
६) अर्थशास्त्र - डॉ.किरण देसले - दिपस्तंभ प्रकाशन, अंमळनेर (जळगांव)
७) दैनिके - लोकसत्ता, नवभारत, लोकमत, दिव्य मराठी, सकाळ, अॅग्रोवन, देशोन्नती



Scanned with OKEN Scanner